स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर करावयाच्या

शोध प्रबंधाचा आराखडा

संत साहित्यातील मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास :

(विशेष संदर्भ: संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम

संशोधक

शेळके उमाकांत पांडुरंग

(एमए, बीएड, नेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. लक्ष्मण नागोराव वाघमारे

मराठी विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर जि. नांदेड

संशोधन केंद्र

भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रस्तावना -

संत साहित्यातील मानवी मूल्यांमुळेच व्यक्तीला आणि समाजाला मूल्य आहे. संतांनी दिलेल्या मानवी मूल्यावरच आज समाजाचा उरलासुरला डोलारा उभा आहे. सतांनी समाज घडविला मूल्य रूजवली ती आजतागायत समाजाच भल करत आहेत. संतांनी देवाच्या अस्तीत्याबद्दल ही प्रश्न उपस्थित केले व त्यामुळे पसरणा-या अवश्रदधेवरती प्रहार केलेला आहे. संताचे कोणतेच मूल्य, कोणतीच शिकवण आजही कालबाह्य झालेली नाही. संतांनी केवळ उपदेश केला नाही. तर त्यांचे आचरण हाच उपदेश होता

"आनंदाचे डोही आनंद तरंग" हा संत तुकाराम यांचा एक अभंग घेतला तरी संत साहित्याची अनुभूती येईल. सुख म्हणजे नक्की काय असतं ? आनंद म्हणजे नक्की काय असतं ? हे केवळ भौतिक गोष्टीवरून कळणार नाही. संत साहित्यातील परमेश्वराच्या सान्निध्याचा आनंद अशी अनुभूती व त्यातुन मिळणारा आनंद हा वैयक्तिक पातळीवर वेगवेगळा असू शकतो. कोण किती व कशात समरस होतो, यावरून आनंदाच परिमाण ठरतं. प्रत्येकाच आनंद वेगळा आनंदाचे क्षण वेगळे, सोहळे वेगळे, यशोशिखरांवर जाऊन, नैराश्यच्या गर्तेत स्वतःला झोकून दयायच नसतं. **ठेविले अनते तैसेची रहावे, चित्ती असो दयावे समाधान** हे संतांनी शिकविले आहे यशाच्या रस्त्यावर समाधानाचे थांबे क्षणभर विश्रांतीसाठी आवश्यक असतात. नेहमी उपेक्षेने तिरस्काराने मनाचे खच्चिकरण झाल्यावर नैराश्य येणार नाही. तर काय नैराश्यावर संत साहित्य हाच उपाय आहे. माणसांना वेळ हवा, संवाद हवा आणि तेच नेसक चुकतय. मनं जिंकायची आयुधं फार वेगळी असतात. मन प्रसन्न करा हे ठिव आहे पण सभोवताली तसा निसर्ग हवा तसं सौदर्य हवं, तर समाधान हव. म चांगल ठेवा व चांगल्या मनाच्या माणसाच्या सोबत रहा. मनाचं काहीच प्रश्न राहण नाहीत. कुणाचे वाईट चिंतू नका, माणसांची बरीच शक्ती जळण्यात जाते. जळ स्वतःला संपवंत. ईतरांवर जळण्यात स्वतः च्या मनाची, स्मशानभूमी कधी होते. माणसांच्या लक्षातच येत नाही. मन पतंगासारखा भरकटतं, त्याला नियंत्रणात ठेव महत्त्वाच असत. संत साहित्य हा आरसा आहे. हा आरसाच आपल्याला ताळयावर आणतात.

नैतिक विकास साधण्यासाठी आणि चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व घडविण्यासाठी मानवी मूल्यांची जोपासना अत्यंत आवश्यक आहे. माणस - माणसातील व्यवहार उचित ठेवण्यासारखे वागले पाहिजे हे वारंवार सांगण्याची गरज अजुनही का पडते ? या प्रश्नाच्या उत्तरातुन मानवी मूल्यांचे अमुल्य तत्व स्पष्ट होते. मानवी मूल्यांचा - हास म्हणजे मानवतेच्या पतनाची सुरूवात होते. हा पराभव थांबावयाचा असेल तर याची गती रोखायची असेल तर संतांनी सांगितलेल्या एकूणच मानवाच्या सर्वांगिण उन्नतीचा मार्ग दाखविणा-या मानवी मूल्यांचा मनापासुन स्वीकार आणि अंगीकार केल्याशिवाय दुसरा पर्याय आपल्यासमोर नाही.

आज संपूर्ण समाजात अशांती, हिंसा, भ्रष्टाचार अनास्था, संशय या गोष्टी अस्तित्वात आहेत. माणसाचा बौद्धिक विकास तर झाला आहे. परंतू आत्मिक विकास सकुचित होत चालला आहे. अशा भयावह परिस्थितीत संवेदनशील व्यक्तीचे मन व्यथित होत आहे. भविष्यप्रती उदासीन होत आहे. यांचे एकमेव कारण म्हणजे मानवी मूल्यांचा -हास हे आहे.

आपल्या ऋषी मुनी संतानी मानवी मूल्यांचे संस्कार आपल्यावर केले होते. परंतु 19 व्या शतकातील वाईट प्रवृत्तीच्या लोकांना या सर्व मूल्यांचा आपल्यामध्ये पुन्हा सचार व्हावा यासाठी मानवी मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

भारतीय सस्कृतीत जिवनाकडे उदात्त दृष्टीने पाहिले गेले आहे. जीवनाला यज्ञ म्हटल्या गेले आहे. या यज्ञातून षडरिपूची आहुती दिल्यानंतर जीवन उदात्त बनते. यासाठी प्राचीन काळी धार्मिक आणि नैतिक शिक्षणाच्या माध्यमातुन मानवी मूल्याचे संस्कार होत गेले होते.

मनुष्यामध्ये गुण दोष यांचे मिश्रण असते गुणांचे संवर्धन आणि दोषांचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. युग परिवर्तन झाल्यावर मुल्य बदलतात. देश धर्मानुसार ते वेगळे असू शकतात. पण काही मूल्य शाश्वत असतात. स्थलकाळानुसार त्यात परिवर्तन होत नाही. तेच मूल्य व्यक्ति आणि मनात नियंत्रणात राहण्यासाठी मदत करतात. समाजाचे मार्गदर्शन करतात त्यामुळे या मूल्यांचे संस्कार होणे आवश्यक आहे

संत साहित्याच्या आधारावर खालील मानवी मूल्य निर्धारित केले गेले आहे

1) सत्य 2) अहिंसा 3) परोपकार 4) देशप्रेम 5) शील 6) सत्संग 7) समता 8) वेळेचे महत्त्व 9) शब्दांचे महत्त्व 10) श्रमप्रतिष्ठा 11) स्त्रीया विषयी दृष्टिकोन 12) बंधूभाव 13) वैज्ञानिक मनोवृत्ती 15) दया 16) क्षमा 17) शांती

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हनून ओळखली जाते. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ संत तुकाराम, संत जनाबाई संत मुक्ताबाई, संत सावतामाळी, संत गोरा कुंभार, संत निळोबा, संत चोखामेळा इ. संतांचा समावेश होतो. महाराष्ट्राला भक्ती संप्रदायाची मोठी परंपरा लाभली आहे. नाथ, महानुभाव वारकरी हे संप्रदाय प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखले जातात. या संप्रदायांचा महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक जीवनावर प्रभाव पडलेला आहे. म्हणूनच भक्ती चळवळीचे आणि इथल्या सर्वसामान्य माणसाचे नाते हे मानले आहे. धार्मिक, सामाजिक, चळवळीनी आपलेसे केले. महात्मा चक्रधरांनी महानुभाव संप्रदायाची स्थापना करून समतेची शिकवण देत स्त्रियांनाही आपल्या चळवळीत महत्त्वाचे स्थान दिले. बाराव्या शतकानंतर वारकरी चळवळीचा उदय झाला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव याबरोबरच इतर संतांनी या चळवळीचे नेतृत्व केले.

वारकरी चळवळ ही बाराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजच्या एकविसाव्या शतकापर्यंत टिकून राहिली. संत नामदेवानी पहिल्यांदा वारकरी संप्रदायात कीर्तनपरंपरा सुरू केली. संत ज्ञानेश्वर, संत गोरोबा काका, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, संत एकनाथ या संतांनी संप्रदायाचे महत्त्व वाढवले आहे पुढच्या काळात सतराव्या शतकात संत तुकाराम वारकरी चळवळीचा कळस झाला.

संत साहित्यातील मानवी मुल्ये केंद्रस्थानी ठेवली. बाराव्या ते अठराव्या शतकात या साहित्याची निर्मिती झाली. बाराव्या शतकापुवी उतरेत यवनांचे आक्रमण झाले त्यामुळे समस्त उत्तर भारत बरबटून गेला होता. दक्षिणेस शैव वैष्णव वाद पराकोटीला गेला होता. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात या दोन्ही संघर्षात समन्वयाची भूमिका घेतली. याचे कारण संतांची शिकवण होय. समाजाला जोडणारे, टिकुन ठेवणारे साहित्य म्हणजे संत साहित्य. संत हे मानवी उणिवावर बोट ठेवणारे लोक

शिक्षकच आहेत. मराठवाडयाची बोलीभाषा हीच प्रमाणभाषा आहे. महाराष्ट्रात आठव्या

शतकापर्यंत सातशे संतांनी संत साहित्याची निर्मिती केली. संतांनी केवळ नामस्मरणच दिले नाही तर नितिमतेची जोपासन तत्वज्ञान आणि उपदेशही सांगितला आहे.

संत साहित्यांची मूलभूत प्रेरणा ही मानव हीच आहे. म्हणून संत साहित्य लोकजीवनाशी जोडलेले आहे. संत साहित्य शाश्वत आणि वैश्विक साहित्य आहे. हे पसायदानावर विश्वात्मतेची संकल्पना देणा-या सर्वश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी सांगितले. सत्य जेवढे व्यापक तेवढेच संत साहित्यही व्यापक आहे संत साहित्याने जगाला शांती, कांती आणि उर्जा दिली.

अभ्यास विषयाची निवड :

आमचे घराने हे वारकरी असल्यामुळे मला लहानपणापासूनच वारकरी चळवळी विषयी नेहमीच आस्था राहिली. गावात अखंड हरिनाम सप्ताह होत असतो. सप्ताहात रोज संध्याकाळी कीर्तन असते. अशी कीर्तन दरवर्षी ऐकवण्यात येत असतात. बहुतांश कीर्तनकार आपल्या कीर्तनासाठी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्या अभंगाचे दाखले देत आपले विचार मांडत असतात. त्यामुळे या संताच्या जीवनकार्याविषयी त्यांच्या मानवी मूल्याविषयी जाणुन घेण्याची आवड निर्माण झाली. म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

संशोधनाची उद्‌दिष्टये :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्‌दिष्टये ठेवण्यात आली आहेत.

1) संतांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूचा अभ्यास करणे

2) संतांच्या चरित्रांचा अभ्यास करणे.

3) संतानी त्यांच्या साहित्यातून सांगितलेली सत्य, अहिंसा परोपकार, देशप्रेम, शील सत्संग समता, बंधूभाव, वेळेचे महत्त्व शब्दांचे महत्त्व श्रमप्रतिष्ठा, स्त्रीयांविषयी दृष्टिकोन, सम्यक वाचा, वैज्ञानिक मनोवृत्ती ही मानवी मूल्ये अभ्यासणे.

4) संतांनी त्यांच्या साहित्यातुन सांगितलेल्या मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास करणे .

संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके ठेवण्यात आले आहेत :

1) संतांनी सर्वसामान्य माणसाच्या हक्क अधिकारासाठी प्रस्थापित व्यवस्थेशी लढा उभारला.

2) संतानी स्वातंत्र्य, समता, बंधूभाव अहिंसा, सत्य परोपकार, श्रमप्रतिष्ठा स्त्रीया विषयी दृष्टीकोन ही मानवी मूल्य त्यांच्या साहित्यातुन मांडली.

3) सत साहित्यातील मानवी मूल्ये संतांच्या चारित्र्याशी व्यक्तिमत्वाशी, सुसंगत वाटतात.

4) संत साहित्यातील मानवी मूल्ये यांचे संतांच्या अभंगांचे सखोल, वस्तुनिष्ठ असे विवेचन केले आहे.

5) संतानी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली.

अभ्यास विषयाचे महत्त्व :

मराठी साहित्यामध्ये वारकरी संप्रदाय आणि या संप्रदायातील संत यांच्या जीवन कार्यावर मोठ्या प्रमाणात लेखन झालेले दिसून येते. संत साहित्यातील मानवी मूल्ये ही महत्त्वाची आहेत. संताची मानवी मूल्ये ही व्यक्ती व समाजाला मार्गदर्शक ठरलेली आहेत. संतांच्या मानवी मूल्यामूळे व्यक्तींना जीवन जगण्यासाठी आधार ठरली आहेत. संतांच्या मानवी मूल्यामूळे व्यक्तींना जगण्याचा पाया मिळाला तर चालण्याचे बळ ही मानवी मूल्ये देतात. संतांच्या मानवी मूल्यामूळे व्यक्ती अधोगतीला न जाता त्याला सद्गती प्राप्त होते. व्यक्तीमध्ये सत्य अहिंसा परोपकार, समता स्वातंत्र्य श्रमप्रतिष्ठा स्त्रीया विषयीचा दृष्टिकोन ही मानवी मूल्ये व्यक्ती आचरणात आणण्यात मदत होते. त्यामुळे संत साहित्यातील मानवी मूल्यांचा अभ्यास होणे महत्तवाचे ठरते.

निवडलेली संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधन विषयाचा अनुषंगाने संशोधन कार्यपूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक चारित्रात्मक समीक्षात्मक अशा संशोधन पद्‌धतीचा वापर केला जाईल.

प्रकरणांची रूपरेषा:

प्रस्तुत संशोधन कार्यपूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरणांची रूपरेषा ठरवलेली आहे.

प्रकरण पहिले:

मानवी मूल्ये संकल्पना व स्वरूप:

प्रस्तुत प्रकरणामध्ये मानवी मूल्ये व्याख्या, मानवी मूल्यामधील विविधता भारतीय समाज परंपरा मानवी मूल्ये आणि भारतीय परंपरा मानवी मूल्यांची भूमिका या विषयी सविस्तर मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे:

वारकरी संप्रदाय प्रेरणा व स्वरूप:

प्रस्तूत प्रकरणामध्ये वारकरी संप्रदाकालीन राजकीय संदर्भ वारकरी संप्रदाय आणि सांस्कृतिक स्थिती, वारकरी संप्रदाय कालीन धार्मिक संदर्भ, वारकरी सप्रदायाची भूमिका, वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान, संत ज्ञानेश्वर आणि वारकरी सप्रदाय यांचा सविस्तर आढावा घेता येईल.

प्रकरण तिसरेः -

संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे वाङ्मयः मानवी मूल्ये:

या प्रकरणामध्ये संत ज्ञानेश्वर यांच्या वाड्.मयातील मानवी मूल्ये, वाड.मयीन मूल्यमापन भाषिक वेगळेपण, वर्तमानातील उपयोगिता संत नामदेव परिचय, संत

प्रकरण चौथे:

संत एकनाथ यांचे वाङ्.मयः मानवी मूल्ये:

प्रस्तुत प्रकरणामध्ये संत एकनाथांचा परिचय, संत एकनाथ यांच्या वाङ्. मयातील मानवी मूल्ये वाङ्मयीन मूल्यमापन भाषिक वेगळेपण, वर्तमानातील उपयोगिता याविषयी सविस्तर आढावा घेतला जाईल.

प्रकरण पाचवे:

संत तुकाराम यांचे वाङ्मयः मानवी मूल्ये:

या प्रकरणामध्ये संत तुकारामांचा परिचय, संत तुकाराम यांचे भाषिक वेगळेपण, वर्तमानातील उपयोगिता मानवी मूल्ये याविषयी सविस्तर मांडणी करता येईल.

प्रकरण सहावे:

निष्कर्ष / उपसंहार:

या प्रकरणात संशोधनाअंती उपलब्ध झालेले निष्कर्ष मांडण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) देशपांडे अ.ना.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, व्हीनस प्रकाशन पुणे. दुसरी आवृत्ती 1995

2) पाटील मुकुंदरावः विठोबाची शिकवण मराठा संस्कृती साहित्य मंडळ लातुर प्रथम आवृत्ती

3) शंकरराव खरात : संताची सामाजिक दृष्टी कॉन्टीनेट प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती 2005

4) **श्रीनिवास दिक्षित** : भारतीय तत्वज्ञान फडके प्रकाशन कोल्हापुर, नववी आवृत्ती 2009

5) **ल.रा. नसिराबादकर** : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास फडके प्रकाशन कोल्हापूर, नववी आवृत्ती **2006**

6) **सं.पा. शिवाजीराव मोहीते:** वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य कर्मवीर प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 2008

7) **प्र. न. जोशी:** मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास प्राचीन काळ स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. तृतीय आवृत्ती 2008

8) **रा. व. दांडेकर** : वारकरी पंथांचा इतिहास वारकरी प्रकाशन मंडळ, नागपूर आवृत्ती दुसरी 1994

9) **डॉ. अनिल कुलकणी:** विशेषांक संत साहित्यातील जीवन मूल्ये आणि मनाचे खेळ

10) **सौ. गायकवाड एस.ए. विशेषांक** : संत साहित्य मे जीवनमूल्ये हिंदी और मराठी संतो के संदर्भ में

संशोधक

शेळके उमाकांत पांडुरंग (एम.ए.बी.एड, नेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.ल.ना. वाघमारे

मराठी विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धा